मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दि.4 नोव्हेंबर 2024 | पान- 1


# तुम्ही नेत्यांना घेऊन लढा मी जनतेला बरोबर घेऊन लढतो : आमदार सुनील शेळके

**महायुतीचे उमेदवार सुनील शेळके यांच्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ : पंचायत समिती समोर झालेल्या जाहीर सभेत शेळके बोलत होते.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

तालुक्यातील बहुतांश प्रस्थापित पुढाऱ्यांनी एकत्र येऊन मला एकटं पाडण्याचा प्रयत्न चालवला आहे, पण मावळातील तमाम जनता माझ्या मागे आहे. तुम्ही नेत्यांना घेऊन लढा मी जनतेला घेऊन लढतो, असे खुले आव्हान मावळ विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आमदार सुनील शेळके यांनी दिले.

मावळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस- भाजप- शिवसेना- आरपीआय- स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार सुनील शेळके यांनी वडगाव मावळचे ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज यांच्यासमोर श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ केला. त्यानंतर पंचायत समिती समोर झालेल्या जाहीर सभेत शेळके बोलत होते.

त्यावेळी खासदार श्रीरंग बारणे, ज्येष्ठ नेते माऊली दाभाडे, गणेश ढोरे, रिपब्लिकन पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रमेश साळवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गणेश खांडगे, शिवसेनेचे तालुकाप्रमुख राजू खांडभोर, एकविरा देवस्थानचे विश्वस्त दीपक हुलावळे, वडगावचे नगराध्यक्ष मयूर ढोरे, भाजपचे माजी नगरसेवक देविदास कडू, सुरेश दाभाडे तसेच किरण गायकवाड, देवा गायकवाड, बबन ओव्हाळ, हरीश कोकरे, पंढरीनाथ ढोरे आदी प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

(उर्वरित पान २ वर)



### शिवसेना महायुतीचा धर्म पाळणार - खासदार बारणे

» आमदार सुनील शेळके यांनी मावळच्या गावागावात विकास पोहोचवण्याचे काम गेल्या पाच वर्षात केले आहे. आपण नेहमीच विकासाला साथ देतो. त्यामुळे शिवसेनेचे सर्व पदाधिकारी व शिवसैनिक महायुती धर्माचे पालन करतील व शेळके यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करतील, अशी ग्वाही खासदार बारणे यांनी यावेळी दिली.

### सर्वपक्षीय नव्हे 'सर्वपुढारीय'

» विरोधी उमेदवाराचा उल्लेख सर्वपक्षीय असा करण्यात येत असल्याबद्दल त्यांनी आक्षेप घेतला. राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना, आरपीआय, स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष यांनी महायुती म्हणून मला पाठिंबा दिला आहे. ते दावा करीत असलेल्या काँग्रेस पक्षानेही त्यांना अजून पाठिंबा दिलेला नाही. त्यामुळे ते 'सर्वपक्षीय' नव्हे तर 'सर्वपुढारीय' नेते आहेत, अशी खिल्ली शेळके यांनी उडवली.

### मतदार म्हणजे मेंढरं नव्हे - शेळके

» वडगावमधील बाबुराव वायकर, सुभाष जाधव, रुपेश म्हाळसकर या पुढाऱ्यांसाठी मी सर्वतोपरी मदत केली, पण त्यांनी माझी साथ सोडली. प्रत्येक गावात जाऊन तेथील पुढाऱ्यासाठी आपण काय काय केले, ते मी सांगणार आहे, असेही शेळके म्हणाले. 'धनगर आपल्या बाजूला करा, मेंढरं आपोआप मागे येतात', या माजी मंत्री मदन बाफना यांच्या वक्तव्याचाही त्यांनी खरपूस समाचार घेतला. पुढाऱ्यांच्या सांगण्यावर कोणाच्याही मागे जायला जनता म्हणजे मेंढरं नाही, अशी टिपणी त्यांनी केली. प्रेम असल्याशिवाय जनता कोणाच्याही मागे जात नाही, असे ते म्हणाले.

### 'सगळ्या भावक्या एकत्र केल्या'

» सुनील शेळके नको म्हणून पक्षीय मतभेद विसरून भेगडे यांनी भावकी एकत्र केली. माझे नाव सुनील भेगडे असते तर मी तर मग मी त्यांना चाललो असतो, अशी मुश्किल टिप्पणी शेळके यांनी केली. भेगडे एकत्र झाले म्हणून तालुक्यातील बाकी सगळ्या भावक्या पण एकत्र झाल्या आणि माझ्या पाठीशी उभ्या राहिल्या आहेत, असे ते म्हणाले.

### 'वारकरी सांप्रदाय त्यांना धडा शिकवेल'

» निवडणुकीचे १५ दिवस मला जपा, मी तुमची पुढील पाच वर्षे काळजी घेईन, अशी ग्वाही शेळके यांनी मावळच्या जनतेला दिली. तालुक्याच्या विकासकामांबरोबर तुमचे दुःख, वेदना माझ्या खांद्यावर द्या. पुन्हा निवडून आल्यानंतर तालुक्यातील प्रत्येक व्यक्तीला मोफत वैद्यकीय उपचार उपलब्ध करून दिले जातील, असे त्यांनी सांगितले.

# हेल्मेट नसल्यास अधिकारी, कर्मचाऱ्यांना महापालिकेत मज्जाव

**महापालिकेत येतानाही हेल्मेट घालणे बंधनकारक आहे, असा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी सुरक्षा विभागाला दिला आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

दुचाकी वापरणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हेल्मेट घालूनच प्रवास करावा. महापालिकेत येतानाही हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. जे अधिकारी-कर्मचारी दुचाकी चालवताना हेल्मेट घालणार नाहीत, त्यांच्या दुचाकीला महापालिका आवारात प्रवेश देऊ नये. तसेच वाहनतळात जागाही उपलब्ध करून देऊ नये, असा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी सुरक्षा विभागाला दिला आहे.



पुणे विभागीय कार्यालयांतर्गत सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, महापालिका, नगरपालिका, नगर परिषद, महाविद्यालये, तसेच शासकीय यंत्रणांच्या कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना दुचाकी वापरताना हेल्मेट वापरणे बंधनकारक केले होते. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका आस्थापनेवरील अधिकारी-कर्मचाऱ्यांसह अन्य शासकीय कार्यालयांतील अधिकारी-कर्मचारी दुचाकी वाहन वापरताना हेल्मे ट वापरत नसल्याचे दिसून आले. त्यामुळे महापालिका आयुक्त सिंह यांनी हेल्मेटसक्तीबाबत आदेश दिला आहे.

महापालिकेतील दुचाकी वापरणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हेल्मेट घालूनच प्रवास करावा. महापालिकेत येतानाही हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. जे अधिकारी-कर्मचारी दुचाकी चालवताना हेल्मेट घालणार नाहीत, त्यांच्या दुचाकीला महापालिका आवारात प्रवेश देऊ नये, वाहनतळात जागाही उपलब्ध करून देऊ नये, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधित विभागप्रमुखांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग केल्याबद्दल दंडात्मक कारवाई करावी. त्यांच्या सेवापुस्तिकेमध्ये नोंदी कराव्यात, असेही आदेशात म्हटले आहे.

# मिळकतकराच्या उत्पन्नास स्थगितीचा ब्रेक

**नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या मिळकतकर वसुलीस स्थगिती देण्यात आल्याने महापालिकेच्या मिळकतकराची उत्पन्नवाढ खुंटली आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांच्या मिळकतकर वसुलीस स्थगिती देण्यात आल्याने महापालिकेच्या मिळकतकराची उत्पन्नवाढ खुंटली आहे. महापालिकेस ऑक्टोबर अखेरपर्यंत १७२५ कोटींचा महसूल मिळाला आहे, तर ३१ मार्च अखेरपर्यंत आणखी ६०० कोटींचे उत्पन्न मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे यंदा पालिकेस २६०० कोटींचे उत्पन्न मिळणे अपेक्षित असताना पालिकेच्या उत्पन्नाचा गाडा २३०० ते २३५० कोटींवरच थांबण्याची चिन्हे आहेत.

२०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या ११ गावांमध्ये या वर्षांपासून पालिकेस १०० टक्के कर मिळणार होता, तर २०२१ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांना ४० टक्के दराने पालिकेने बिले दिलेली आहेत. त्यामुळे यंदा पालिका मिळकतकराच्या उत्पन्नाचा २५०० कोटींचा आकडा पार करेल, अशी चिन्हे होती. मात्र, शासनाने ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर समाविष्ट ३४ गावांमध्ये करवसुलीला स्थगिती दिल्याने त्याचा सरळ सरळ फटका महापालिकेच्या उत्पन्नास बसणार आहे. महानगरपालिकेचे उत्पन्न घटणार असून, याचा फटका विकासकामांना बसणार आहे.

पुणे महापालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या मालमत्ता करासंदर्भात निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. शिवतारे यांच्या पत्रावर मुख्यमंत्री शिंदे यांनी नगरविकास विभागाला आदेश दिले आहेत. या आदेशामुळे या गावात महापालिकेकडून केली जाणारी मिळकत कर वसुली थांबवणार आहे. महापालिकेला या ३२ गावांमधील मिळकत कराची फेररचना नव्याने करावी लागणार आहे.

निवडणुका डोळ्यासमोर ठेवून निर्णय राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. राज्य सरकारने मिळकत कर वसुलीबाबत घेतलेल्या या निर्णयाचा फायदा महायुतीच्या उमेदवारांना व्हावा, यासाठी आचारसंहिता सुरू होण्याच्या अगोदर काही तास हे आदेश काढण्यात आले आहेत. कर वसुलीसाठी राज्य सरकारने स्थगिती दिली असली तरी या गावात महापालिकेला मूलभूत सोयी सुविधा द्याव्या लागणार आहेत. यासाठी पालिकेला निधी द्यावा लागणार आहे.



### भांडवली कामांना बसणार फटका?

» शहरात नगरसेवक नसल्याने नागरिकांसाठीच्या छोट्या मोठ्या कामांची जबाबदारी प्रशासकावर आहे. मात्र, प्रशासनाकडून दैनंदिन कामे, तसेच देखभाल दुरुस्तीची कामे होत नसल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत. त्यातच गेल्या दोन ते अडीच वर्षांत शहरात दहा हजार कोटींपेक्षा अधिक रकमेचे प्रकल्प सुरू असून, त्यांची बिले महापालिकेस देणे बंधनकारक आहे. त्यामुळे घटलेल्या उत्पन्नाचा फटका महापालिकेच्या दैनंदिन कामांना बसणार आहे.

### आर्थिक कोंडी

» महापालिका दरवर्षी नोव्हेंबर महिन्यापासून शहरातील मिळकतकराच्या थकबाकी वसुलीस सुरुवात करते. त्यातच महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमधील मिळकतकराची थकबाकी ५०० कोटींवर आहे. त्यामुळे या वसुलीसाठी विशेष नियोजन केले होते. मात्र, सहा महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीवेळी शासनाने ११ गावांमधील शास्तीकर वसुलीला स्थगिती दिली. त्यानंतर २३ गावांमधील नागरिकांनी महापालिकेचा कर जास्त असल्याने तो कमी करण्याची मागणी केली. त्यामुळे ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शासनाने महापालिकेस आदेश देत या गावांतील सरसकट करवसुली थांबविण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय कररचनेची फेरतपासणी करून ग्रामपंचायत कराच्या दुप्पट मिळकतकर असू नये, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे महापालिकेची आर्थिक कोंडी झाली आहे.

# पुण्यात पुन्हा हिट अँड रन! रस्त्यावर फटाके फोडणाऱ्याला भरधाव कारने दिली धडक

**व्यक्तीला भरधाव कारने धडक दिली आहे, या भीषण अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.**

**पुणे | प्रतिनिधी**

दिवाळीनिमित्त रस्त्यावर फटाके फोडणाऱ्या ३५ वर्षीय व्यक्तीला भरधाव कारने धडक दिली आहे. या भीषण अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. १ नोव्हेंबर रोजी पुण्याच्या पिंपरी-चिंचवडमधील रावेत भागत ही घटना घडली. या घटनेचं सीसीटीव्ही फूटेज आता पुढे आलं आहे. महत्त्वाचे म्हणजे अद्यापही पोलिसांनी आरोपींचा शोध न घेतल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त केला जातो आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, सोहम पटेल असं मृत्यू झालेल्या व्यक्तिचं नाव आहे. १ नोव्हेंबर रोजी रात्री तो त्याच्या रावेत येथील फेलीसिटी सोसायटीसमोर फटाके फोडत होता. यावेळी रस्त्याने जाणाऱ्या भरधाव कारने त्याला जोरदार धडक दिली. त्यामुळे तो रस्त्याच्या बाजुला जाऊन पडला. या भीषण अपघातामुळे त्याच्या डोक्याचा जबर मार लागला. या अपघातानंतर स्थानिकांनी याची माहिती लगेच पोलिसांना दिली. तसेच त्याला तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत्यू घोषित केलं.

दरम्यान, ४८ तास उलटूनही अद्याप पोलिसांनी वाहन चालकाला शोधून कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे आता नागरिकांकडून संताप व्यक्त केला आहे. पुण पोलिसांनी आरोपीला तत्काळ शोधून अटक करावी, तसेच त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जाते आहे.

खरं तर मागच्या काही महिन्यात पुण्यातील हिट अँड रनची ही दुसरी घटना आहे. काही महिन्यांपूर्वी पोर्श गाडीने अशाचप्रकारे दोघांना धडक दिली होती. त्यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला होता. याप्रकरणी पोलिसांनी अल्पवयीन आरोपी तसेच त्याच्या वडिलांना अटक केली होती.

# तुम्ही नेत्यांना घेऊन लढा मी जनतेला बरोबर घेऊन लढतो : आमदार सुनील शेळके

**पिंपरी | प्रतिनिधी**

(पान १ वरून )

आपल्या २० मिनिटांच्या भाषणात सुनील शेळके यांनी विरोधकांवर आक्रमक पद्धतीने हल्ला चढवला. काही पुढाऱ्यांनी मला तालुक्यात एकटे पाडायचा प्रयत्न चालवला आहे. त्याची प्रतिक्रिया म्हणून एवढी मोठी जनता माझ्या पाठीशी जमा झाली आहे. व्यासपीठावरील ५० पुढारी म्हणजे मावळची जनता नाही. माझ्यावर टीका करणाऱ्या पुढाऱ्यांच्या माता- भगिनी देखील माझ्याबरोबर आहेत. तुम्ही नेत्यांना घेऊन लढा, मी जनतेला बरोबर घेऊन लढतो, असे आमदार शेळके यांनी विरोधकांना सुनावले.

गेल्या पाच वर्षात आपण कोणालाही दुखावले नाही, कोणाला त्रास दिला नाही, कुणाची फसवणूक केली नाही, कोणाचा विश्वासघात केला नाही. तरीही एवढे पुढारी माझ्या विरोधात जायचे कारण काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

कधीही घराबाहेर न पडलेल्या माता-भगिनींसाठी तीर्थयात्रा व सहली काढल्या तर विरोधकांच्या पोटात दुखत आहे. वारकऱ्यांवर आरोप करणाऱ्यांना त्यांची जागा दाखवून दिल्याशिवाय वारकरी सांप्रदाय राहणार नाही. मला विरोध करणाऱ्यांनी कधी कुणासाठी एक रुपया देखील खर्च केलेला नाही. मी मात्र सर्वांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी काम करतो. निवडून आल्यानंतर कधीही विमानाने प्रवास न केलेल्या माता-भगिनींना विमान प्रवासाचा आनंद देखील मी देणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# राष्ट्रवादीच्या फुटीने मतांचं गणित बदलणार

## चिंचवडच्या पोटनिवडणुकीत भाजपची मतं सुरक्षित होती, आताही तीच परिस्थिती असल्याने फटका आघाडीला बसण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चिंचवडविधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीकडून भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांना उमेदवारी मिळाली आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून नाना काटेही इच्छुक होते. मात्र त्यांना महायुतीकडून डावलण्यात आलंय. नाना काटेंनी बंडखोरी करून अपक्ष उमेदवारी अर्ज भरलाय. या बंडखोरीचा फटका महाविकास आघाडी की महायुतीला बसणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.



चिंचवड पोटनिवडणुकीत भाजपच्या विजयी उमेदवार अश्विनी जगताप यांना या पोटनिवडणुकीत १ लाख ३५ हजार ४९४ मतं मिळाली. तर नाना काटे यांना ९९ हजार ४२४ मतं मिळाली. दुसरीकडे राहुल कलाटे यांनी ४० हजार ७५ मत मिळाली होती. त्यावेळी राहुल कलाटे यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. त्यामुळे राष्ट्रवादीची मतं विभागली गेली असल्याची प्रतिक्रिया काटेंनी पराभवानंतर दिली. पोटनिवडणुकीत राहुल कलाटे यांनी मविआ नेत्यांच्या आग्रहानंतर उमेदवारी अर्ज मागे घेतला असता तर चित्र वेगळं दिसलं असल्याचे त्यांनी सांगितलं होतं. पोटनिवडणुकीत मतांचं गणित पाहता कलाटे यांनी ४० हजार मतं मिळवली आहेत. काटेंनी ९९ हजार मतं मिळवली आहेत. जर कलाटे अपक्ष लढले नसते तर अश्विनी जगताप यांच्या मतांच्या जवळपास काटे नक्कीच पोहोचले असते.

आगामी विधानसभेत त्याउलट चित्र दिसू लागले आहे. राहुल कलाटे यांनी महाविकास आघाडी कडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. नाना काटेंनी बंडखोरी करत अपक्ष फॉर्म भरला आहे.

### काटे बंडखोरी कायम ठेवणार

**» चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुती मधील घटक पक्ष राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, भाऊसाहेब भोईर यांनी अर्ज कायम ठेवले आहेत. बंडखोरी शमवण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार पिंपरी चिंचवड शहरात दाखल झाले होते. मात्र नाना काटेंनी माघार न घेतल्याचे सांगितले होते. यावरून काटे बंडखोरी कायम ठेवणार असल्याचे सध्यातरी दिसते आहे.**

पक्ष फुटल्याने दोन्ही मतांचं गणित आता बदलण्याची शक्यता आहे. पोटनिवडणुकीत कलाटे यांच्या बंडखोरीने भाजपाला फायदा झाला होता. आता नाना काटे अजित पवार गट म्हणजेच महायुतीत आहेत. काटेंनी बंडखोरी केल्याने आता महायुतीची डोकेदुखी वाढली आहे. परंतु भाजपची मतं त्यांनाच मिळण्याची शक्यता आहे. पक्षफुटीने राष्ट्रवादीच्या मतांची विभागणी होण्याची शक्यता वाढली आहे. भाजपची मतं सध्यातरी सुरक्षित असल्याने आघाडीला फटका बसण्याची शक्यता आहे.

> चिंचवड ची जागा महायुतीत भाजप ला गेली आहे. नाना काटे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केलाय. म्हणून भेटायला आलो आहे. कार्यकर्त्यांच्या भावना तीव्र आहेत. मी सांगेल तोच निर्णय घ्यावा लागेल अस मी त्यांना सांगितलं आहे
> - अजित पवार, उपमुख्यमंत्री.

# चिंचवडच्या विकासाची धुरा सक्षम नेतृत्वाच्या हातात द्या

## महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या महाविजयासाठी आमदार अश्विनी जगताप यांचे चिंचवडगाव वासियांना साकडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभेच्या विकासाची धुरा सक्षम नेतृत्वाच्या हातात द्या, विकासाची ही गंगा अखंडपणे वाहती ठेवण्यासाठी महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांना मतदारांनी भरघोस मतांनी विजयी करा असे साकडे आमदार अश्विनी जगताप यांनी चिंचवडगाव वासियांना घातले.



चिंचवड विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार शंकर जगताप यांच्या प्रचारार्थ आमदार अश्विनी जगताप यांनी चिंचवडगाव येथील ग्रामस्थ तसेच मतदारांची भेट घेत संवाद साधला.

यावेळी माजी महापौर अपर्णा डोके, माजी नगरसेविका अश्विनी चिंचवडे, पिंपरी चिंचवड भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा उज्वला गावडे, भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारिणी सदस्य मोरेश्वर शेडगे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, स्वीकृत सदस्य विठ्ठल भोईर, आवेश चिंचवडे, गणेश मिरजकर, योगेश चिंचवडे, अजित कुलथे, रवि देशपांडे, मधुकर बच्चे, विनोद मालू, शुभम डांगे, प्रदिप सायकर, प्रशांत आगज्ञान, गणेश गावडे, सुजित गावडे यांच्यासह महायुतीचे सर्व पक्षाचे पदाधिकारी, यासह चिंचवडकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या दौऱ्यात आमदार अश्विनी जगताप यांनी सर्वपक्षीय माजी नगरसेवक, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, ज्येष्ठ नागरिक, सार्वजनिक मंडळांचे कार्यकर्ते तसेच महिला मंडळांच्या सदस्यांसोबत संवाद साधला आणि विविध गाठीभेटी घेतल्या. यावेळी आमदार जगताप म्हणाल्या की, सर्व समावेशक घटकांचा आणि आपल्या चिंचवड विधानसभेचा सर्वांगीण विकास समावेश हेच आमचे उद्दिष्ट आहे. शंकर जगताप यांच्या विजयाने हा विकासाचा प्रवास आणखी बळकट होणार आहे, असा विश्वास अश्विनी जगताप यांनी व्यक्त केला.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या विकासाचा वारसा जपण्याचे उद्दिष्ट आणि यापुढील काळात त्याला अधिक प्रगतीची दिशा देण्याचा संकल्प अश्विनी जगताप यांनी सर्वांसमोर मांडला. गेल्या काही वर्षांत मतदारसंघातील पायाभूत सुविधा, सार्वजनिक आरोग्यसेवा, शैक्षणिक विकास, तसेच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील प्रगती या सर्व मुद्द्यांवर आम्ही सातत्याने काम केले आहे. तसेच यापुढेही चिंचवड विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकास करण्याकरिता महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांनाच मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन आमदार अश्विनी जगताप यांनी केले आहे.



# कोथरूडमध्ये भाजपची मतं सुरक्षित

## महायुतीकडून चंद्रकांत पाटील, माविआकडून चंद्रकांत मोकाटे आणि मनसेकडून किशोर नाना शिंदे निवडणुकीच्या रिंगणात



**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील कोथरूड विधानसभा मतदार संघ भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. २०१४ पासून प्रचंड मताधिक्याने भाजप कोथरुडमध्ये निवडून येत आहे. मागील निवडणुकांच्या मतांचे गणित पाहता भाजपची मतं आतापर्यंत सुरक्षित असल्याचे दिसून आले आहे. मात्र आगामी विधानसभेच्या निवडणुकीत तिरंगी लढत होणार असल्याने मतांच्या विभागणीचा फटका कोणाला बसणार? हे पाहणं औत्सुक्याचे ठरणार आहे. महायुतीकडून चंद्रकांत पाटील, महाविकास आघाडीकडून चंद्रकांत मोकाटे आणि मनसेकडून किशोर नाना शिंदे निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

कोथरूड हा विधानसभा मतदारसंघ २००९ मध्ये अस्तित्वात आला. यापूर्वी हा मतदारसंघ शिवाजीनगरचा भाग होता. भाजपने कसब्याप्रमाणेच या मतदारसंघावर वर्चस्व मिळविले असले तरी येथे पहिली मोहोर शिवसेनेने उमटविली. पुनर्रचनेनंतर पहिल्याच निवडणुकीत चंद्रकांत मोकाटे निवडून आले. त्याही आधी शशिकांत सुतार यांनी हा शिवसेनेचा बालेकिल्ला केलाच होता, पण नंतरच्या काळात कसबा, सदाशिवपेठ, नारायणपेठ इथले रहिवासी वाढू लागले आणि राजकीय वारेही बदलले.

कोथरूड मतदारसंघ अस्तित्वात आल्यानंतर झालेल्या पहिल्याच २००९ च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या चंद्रकांत मोकाटे यांनी ५२ हजार ०५५ मते घेऊन मनसे उमेदवार ॲड. किशोर शिंदे यांचा पराभव केला. शिंदे यांना ४४ हजार ८४३ मते मिळाली होती. मोकाटे यांनी ७ हजार २१२ मतांची आघाडी घेतली होती. सन २०१४ लोकसभा निवडणुकांमधील अपयशाच्या पार्श्वभूमीवर सत्तेवर असलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांनी आपली आघाडी मोडत निवडणूक वेगवेगळी लढवण्याचे ठरवले. भारतीय जनता पक्ष व शिवसेना यांची २५ वर्षे सुरू असलेली युतीदेखील संपुष्टात आली. यामुळे महाराष्ट्रामधील सर्व प्रमुख मतदारसंघांमध्ये बहुरंगी लढत झाली होती. कोथरूडमधून भाजपच्या मेधा कुलकर्णी यांनी १ लाख ९४१ मते घेऊन शिवसेनेच्या मोकाटे यांचा पराभव केला. मोकाटे यांना ३६ हजार २७९ मते पडली. कुळकर्णी ६४ हजार ६६२ मतांची लीड घेऊन विजयी झाल्या. कोथरूडमधील आतापर्यंतचे हे सर्वात मोठे मताधिक्य आहे.

सन २०१९ मध्ये भाजपचे चंद्रकांत पाटील विजयी झाले. त्यांना १ लाख ५ हजार २४६ मते मिळाली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार किशोर शिंदे यांना ७९ हजार ७५१ मिळाली. त्यांचा २५ हजार ४९५ मतांनी पराभव झाला. भाजपच्या चंद्रकांत पाटील यांना ५३.९३ टक्के मते मिळाली, तर शिंदे यांना ४०.८७ टक्के मते मिळाली.

कोथरूड मतदार संघ अस्तित्वात आल्यापासून भाजपच्या मतांना अजिबात धक्का लागलेला नाही. मागील निवडणुकीत तर मनसेला इतर पक्षांनी पाठिंबा देऊनही शिंदेंचा २५ हजारांनी पराभव झाला होता. आता तिरंगी लढत होणार आहे. शिवसेना उद्धव ठाकरे गट आणि मनसे दोन्ही पक्षांना कोथरुडमध्ये मताधिक्य असल्याचे दिसून आले आहे. मात्र ते भाजपच्या मतांसमोर कमीच असल्याचे दिसते आहे. भाजप हे दोघांसमोरील आव्हान आहे. मतांचं गणित बदलण्यासाठी अथवा निवडून येण्यासाठी जोर लावावा लागेल असं सध्या तरी दिसते आहे.

# दुसऱ्या दिवशी देखील पुणे सातारा महामार्ग जाम

## दीपावली सुट्ट्या संपत आल्याने गावाला गेलेले चाकरमानी पुन्हा कामावर हजर : प्रवाशांना नाहक मानसिक त्रास



**पुणे | प्रतिनिधी**

काम करणाऱ्या ठेकेदारावर प्रकल्प संचालक संजय कदम हे कानाडोळा करत असल्याने पुणे सातारा महामार्गावरील शिवरे ( ता. भोर ) उड्डाणपूलाचे काम रखडले आहे. येथील सेवा रस्ते अरुंद असल्याने सतत वाहतूक होत राहते. या पार्श्वभूमीवर वर्तमानपत्राच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांनी लक्ष देण्याची मागणी प्रवाशांमधून होत असताना देखील याकडे प्रशासनाने अक्षम्य दुर्लक्ष करत असल्याने रविवारी दुसऱ्या दिवशी देखील वाहतूक कोंडी कायम राहिली असल्याने प्रवाशांना नाहक मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

जोडून आलेली दीपावली सुट्ट्या संपत आल्याने गावाला गेलेले चाकरमानी पुन्हा कामावर हजर होण्यासाठी पुणे, मुंबईकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढल्याने पुणे - सातारा महामार्गावर पुणे बाजूकडे वाहतूक कोंडी झाली आहे. पुणे बाजूला जाणाऱ्या वाहनाच्या रांगा वरवे ते खेडशिवापूर टोलनाकापर्यंत तब्बल चार किलोमीटरच्या वाहना रांगा लागल्या आहेत. वाहतूक पोलिस टप्प्याटप्प्याने वाहतूक सोडत आहे. मात्र वाहतूक कोंडीत अडकल्याने लहान मुले, वयोवृद्ध यांचे हाल होताना दिसून येत आहे.

सातारा, कोल्हापूर, सांगली, महाबळेश्वर येथील चाकरमानी पुणे, मुंबईकडे परतीच्या मार्गावर असल्याने रविवार दुपारनंतर पुणे बाजूकडे जाताना वाहतूक कोंडीत भर पडत आहे. शिवरे येथील उड्डाणपुलाचे काम करणारे निखिल कन्स्ट्रक्शन कडून काम कासवगतीने सुरू आहे. कामाच्या ठिकाणी अपघात प्रवणक्षेत्र निर्माण झाल्याने रोजच छोट मोठे अपघात घडत आहे. यामुळे आणखीनच वाहतूक कोंडीत भर पडत आहे. गाव खेड्यातील गल्ली बोळाप्रमाणे सेवा रस्त्याची अवस्था झाली असून अरुंद रस्त्यामुळे वाहनाचा वेग मंदावत आहे. काम करणाऱ्या ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याची मागणी स्थानिक व प्रवाशांमधून होत आहे. वाहतूक कोंडीमुळे कायदा सुव्यवस्था प्रश्न ऐरणीवर येत असल्याने जिल्हाधिकारी यांनी वेळेत लक्ष देणे गरजेचे असल्याचे बोलवले जात आहे.

### ठेकेदारांचा नुसताच दिखावा..

**» पुणे - सातारा महामार्गाचे काम करणारे रिलायन्सचे ठेकेदार उर्वरित काम करणारे निखिल कन्स्ट्रक्शन कडून कामाचा दर्जा राखला जात नाही. तर वाहतूक कोंडी सुरळीत करणाऱ्या पोलिसांच्या समवेत ठेकेदाराची कर्मचारी वाहतूक कोंडी सोडवण्याचे फोटोसेशन करत असून पोलिसांच्या मदतीने वाहतूक पोलीस केली आहे असा मेसेज आपल्या वरिष्ठांना पाठवून नुसताच दिखावा करत आहे.**